

Vidya Prasarak Mandal's

DR. GHALI COLLEGE

GADHINGLAJ

Affiliated to Shivaji University

# DR.GHALI COLLEGE, KOLHAPUR

## Criterion: 7

## Institutional Values and Best Practices

**7.1.4 Describe the Institutional efforts/initiatives in providing an inclusive environment i.e., tolerance and harmony towards cultural, regional, linguistic, communal socioeconomic and Sensitization of students and employees to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens**

## HOSTEL AS DEDICATED COVID-CENTRE

Dr. S. A. Masti

(Co-ordinator IQAC)

Dr. Ghali College Estd. 1984 Gadhinglaj

Principal

Dr. Ghali College

Gadhinglaj, Dist. Kolhapur

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

ONE HUNDRED RUPEES

रु. 100

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2019 ◐

WE 307850

| | |
|---|---|
| दस्ताचा प्रकार/अनुच्छेद क्रमांक | संमतीपत्र/करारपत्र |
| दस्त नोंदणी करणार आहे का? | — |
| नोंदणी होणार असलेस दुय्यम निबंधक कार्यालयाचे नांव | — |
| मिळकतीचे वर्णन | — |
| मोबदला रक्कम | — |
| मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव | श्री विनय आनंदा हरेर रा. हाजगोळी ता. आजरा |
| दुसऱ्या पक्षकाराचे नांव | अनिरुद्ध केदारी रेडेकर |
| हस्ते असल्यास त्याचे नांव व पत्ता | — |
| मुद्रांक शुल्क रक्कम | १००/- |
| मुद्रांक विक्री नोंद वही अनु.क्रमांक/दिनांक | १२८३१ २५/०६/२०२० |

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

17 JUL 2020

SUB TREASURY OFFICE GADHINGLAJ

मुदत बंद परवाना करारपत्र

(लिव्ह अँड लायसन्स करारपत्र)

मौजे औरनाळ, तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथील मिळकतीबाबत

ता. २५/०८/२०२० इ. रोजीचे.

| | |
|---|---|
| **विद्या प्रसारक मंडळ, गडहिंग्लज करीता डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज चे सचिव ॲड. बाबूराव गुरुपादप्पा भोसकी** वय : ७४ वर्षे, धंदा : वकिली, रा. गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | लिहून घेणार |
| **डॉ. विनय आनंदा हरेर,** वय : २८ वर्षे, धंदा : वैद्यकिय, रा. एन. एम. जोशी मार्ग, बी. डी. डी. चाळ-२५/२९, डिलाईल रोड, मुंबई-१३ सध्या रा. हाजगोळी खुर्द, ता. आजरा, जि. कोल्हापूर | लिहून देणार |

कारणे लिहून देतो मुदत बंद परवाना चार महिने मुदती करीता ऐसाजे

अ) **मिळकतीचे वर्णन :-**

मौजे औरनाळ, ता. गडहिंग्लज येथील गट नं. २४३ क्षेत्र हे. आर. ०१.९० यापैकी क्षेत्र हे. आर. ००.१४ या क्षेत्रामध्ये बांधलेली बहुमजली मुलींचे वसतीगृहची इमारत.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही करार मिळकत होय. सदर मिळकत मी माझे **कोव्हीड हॉस्पीटल या** कारणाकरीता वापर करणार आहे.

ब) उपरोक्त कलम ''अ'' मध्ये वर्णन केलेली मिळकत ही तुमचे मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. सदरची मिळकत ही माझे मागणी व विनंती वरून मला माझे **कोव्हीड हॉस्पीटल या कारणाकरीता** दिनांक ०१/०९/२०२० पासून **चार महिने** मुदती करीता परवाना देऊन तुमचे व माझे दरम्यान खालील अटी व नियमांची बांधीलता करुन घेतली त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

**अटी व नियम:**

१. तुमचे उपरोक्त वर्णनाचे मालकी व कब्जे वहिवाटीची मिळकत मला माझे **कोव्हीड हॉस्पीटल या कारणाकरीता** मुदत बंद परवाना कराराचे (लिव्ह अँड लायसेन्सी) शर्तीवर दि. ०१/०९/२०२० पासून **चार महिने** मुदती करीता वापर करणेस परवानगी देऊन सदर मिळकत माझे ताबेत दिली आहे.

२. मी लायसेन्सी या नात्याने सदर फक्त **चार महिने** मुदती करीता तारीख ०१/०९/२०२० इ. पासून घेतली आहे. या मुदत बंद परवाना करार पत्राची मुदत तारीख ३१/१२/२०२० इ. रोजी संपण्याची व पुरी होण्याची आहे.

३. मी लायसेन्सी म्हणून या जागेचा **चार महिने** पूर्ण होईपर्यंत वापर करणार असल्याने त्या वापराबद्दल तुमचे व माझे दरम्यान ठरल्याप्रमाणे लायसेन्स फी म्हणून मी तुम्हांस दरमहा रक्कम रूपये ४०,०००/-**(अक्षरी रुपये चाळीस हजार फक्त)** या प्रमाणे देणेचे आहे.

४. सदर व्यवसायाकरीता लागणारे सर्व शासकीय परवाने मिळणेस तुमची या करारा आधारे संमती असून कोणतीही हरकत अगर तक्रार नाही.

५. सदर मिळकत मी वर नमुद केले कारणाकरीताच करू. तसेच सदर मिळकतीचा मी इतर अगर अन्य कोणत्याही कारणा करीता वापर करणार नाही.

SECRETARY
Vidya Prasarak Mandal
GADHINGLAJ

६. सदर कराराची मुदत ही **चार महिने** मुदती करीता असून करार पूर्ती पूर्वीच आम्हांस जागा सोडणेची झालेस मी अगाऊ एक महिने पूर्व सूचना तुम्हांस देईन अगर सदरची जागा तुम्हांस हवी असल्यास आम्हांस एक महिने अगोदर आगाऊ पूर्व सूचना तुम्ही देणेची आहे.

७. सदर मिळकत ही माझे **कोव्हीड हॉस्पीटल या कारणाकरीता** वापर करणार आहे. या मिळकतीचा कोणताही हिस्सा पोट कुळाने भाडेपट्टीने अगर अन्य मार्गाने तुमचे कोणतेही अधिकारास धक्का अगर हानिकारक होईल या हेतूने व्यवहार करणार नाही.

८. सदर मिळकत माझे वहिवाटीस आल्यापासून त्याची देखभाल मी करणेची आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा कायम स्वरूपी फेर बदल बांधकाम करणेचे झालेस तुमची पूर्व परवानगी घेतल्या खेरीज करणार नाही.

९. मिळकतीचे येणारे **लाईट बिल** मी भरणेचे असून त्यामध्ये कोणताही विलंब करणार नाही. सदर मिळकतीचा **घरफाळा** हा मी भरणेचा आहे. सदर मिळकतीमध्ये पाण्याची व्यवस्था मी करणेची आहे.

१०. सदर मिळकतीचे कांही नुकसान झाल्यास सर्व नुकसान भरपाई देण्याची पूर्ण जबाबदारी आमची राहील. आम्ही तुमचे झालेले नुकसान विना हरकत विना तक्रार त्वरीत अदा करीत आहे.

११. बॉम्बे रेंट ॲक्टखाली भाडेकरू म्हणून आम्हांस सदर जागे संबंधी कोणताही हक्क प्राप्त झालेला नाही व तसा हक्क संबंध आम्ही केव्हांही सांगणार नाही. तुम्ही लायसेन्सॉर व आम्ही लायसेन्सी असाच संबंध उभयपक्षी समजणेत आलेला आहे.

१२. वरील सर्व अटी शर्ती व नियम आमचेवर पूर्णपणे बंधनकारक आहेत. आम्ही सर्व अटी व नियम कसोशीने पाळू. कोणत्याही अटी व नियमांचा भंग करणार नाही अगर तसा भंग आमचेकडून झालेस सदरचा परवाना करार रद्द करावा.

१३. हा मुदत बंद परवाना करारपत्र (लिव्ह अँड लायसन्स करारपत्र) आम्ही आमचे राजी खुषीने लिहून दिला आहे. या करीता साक्षीसाठी आज रोजी आपली स्वाक्षरी दस्तावर केली आहे.

म्हणून लिहून दिला मुदत बंद परवाना करारपत्र सही तारीख २५/०८/2020 इ.



दस्तकार

संदिप शं. [illegible]
M.A.LL.B.(Special) M.B.A

---------------- लायसेन्सी (लिहून देणार)



SECRETARY
Vidya Prasarak Mandal
GADHINGLAJ

---------------- लायसेन्सॉर (लिहून घेणार)

SECRETARY
Vidya Prasarak Mandal
GADHINGLAJ

साक्षीदारः-

१. श्री उदयसिंग लक्ष्मण पोवार रा. गडहिंग्लज

२. श्री सागर गणपती लोडकर रा. गडहिंग्लज